

चित्रकार आणि पक्षी

मॅक्स.


मराठी अनुवाद :

फारूक एस.काझी




चित्रकार
आणि
पक्षी.

एक चित्रकार होता. बहुतांश चित्रकारांसारखा तो ही गरीब होता. आत्तापर्यंत त्याने खूप सुंदर सुंदर चित्रं काढली होती. त्याला त्याची सर्वच चित्रं आवडायची. पण, त्यातलं एक चित्र त्याचं जास्त आवडतं होतं. एका विचित्र आणि सुंदर पक्ष्याचं चित्र.




एके दिवशी एक श्रीमंत माणूस त्याची सर्व चित्रं पाहायला आला. तो उशीरपर्यंत चित्रं पाहत होता. मात्र त्याला एक चित्र सर्वांत जास्त आवडलं. ते चित्र होतं त्या विचित्र आणि सुंदर पक्ष्याचं. चित्रकाराला ते चित्र विकायचं नव्हतं. परंतु श्रीमंत माणसाने जास्तीची रक्कम देऊन ते चित्र विकत घेतलं. चित्रकाराला नकार देता आला नाही. श्रीमंत माणसाने चित्राचे पैसे दिले आणि तो चित्र घेऊन गेला.



श्रीमंत माणूस आपल्या लाल रंगाच्या आलीशान गाडीतून चित्र घेऊन गेला. त्याचं शहरात एक भलं मोठं घर होतं. त्याने ते चित्र एका सुंदर खोलीत नेऊन लावलं. तो नेहमी त्या चित्राकडे पाहत राही. श्रीमंत माणूस खुश होता.

मात्र, तो विचित्र आणि सुंदर पक्षी मात्र अजिबात खुश नव्हता. त्याला चित्रकाराची खूप आठवण येई. आणि एक दिवस तो पक्षी उडून गेला.







चित्रातील पक्षी उडून बागेत गेला. तिथं त्याला एक देखणा कोंबडा दिसला.

“तू मला चित्रकाराला शोधायला मदत करशील का? तो खूप चांगला माणूस आहे. त्याची लांब दाढीही आहे.” पक्ष्याने कोंबड्याला विनंती केली.

“अरे, मी नाही मदत करू शकत तुला. मी या बागेतून कधीच बाहेर गेलेलो नाही. तू जंगलातल्या पक्ष्यांना विचार. त्यांना माहित असेल.” कोंबड्याने दिलगिरी व्यक्त केली.




जंगलातील पक्षी चित्रातील पक्ष्यावर हसू लागले.

“तू किती विचित्र दिसतोस...! तू तर प्राणीसंग्रहालयात असायला हवा होतास. इतर विचित्र प्राण्यांसारखा.आणि तिथं एक दाढीवाले प्राणी आहे. तोच तुझा तो चित्रकार मित्र असेल कदाचित !”


चित्रातील पक्षी उडून प्राणीसंग्रहालयात गेला. तिथं एका पिंजऱ्यातल्या मोठ्या प्रण्याजवळ तो गेला. त्याला दाढी होती. पण तो सिंह होता. चित्रकार नव्हे.

“मी जंगलाचा राजा आहे.” सिंहाने गर्जना करत सांगितले.

“तू जेव्हा माझ्या डोक्यावर बसतोस तेव्हा तू माझ्या मुकुटासारखा दिसतोस. तू इथंच का राहत नाहीस? न जाणो तुझा तो चित्रकार माझंच चित्र काढायला इथं येईल. तेव्हा तू त्याला भेटू शकशील. मुकुटासह सिंहाचं चित्र! याहून सुंदर ते कोणतं चित्र असू शकेल !”



चित्रातील पक्षी तिथंच थांबला. सिंहाच्या डोक्यावर विचित्र पक्ष्याला बसलेलं पाहायला दूरवरून लोक येऊन गेले. पण, चित्रकार काही आला नाही.








प्राणिसंग्रहालयाच्या संचालकांनी जेव्हा विचित्र पक्ष्याला पाहिलं, त्यांना खूप आश्चर्य वाटलं. “मी असा पक्षी या आधी कधीच पाहिलेला नाही. मला याचा अभ्यास करावा लागेल. हा पक्षी माझ्या नावाने ओळखला जाईल. मी खूप प्रसिद्ध होईन.” असं म्हणून त्यांनी त्या पक्ष्याला कार्यालयात आणलं. पण, ते पक्षीकोश वाचण्यात गढून गेले. इतके की त्यांना चित्रातील पक्ष्याचाही विसर पडला. बिचारा पक्षी दूर उडून निघून गेला.





दुःखी चित्रातील पक्षी उडतच राहिला. त्याचे डोळे पाण्याने भरून आले होते.
इतक्यात त्याला आकाशात काहीतरी उडताना दिसलं.
‘तो मोठा पांढरा पक्षी तर नव्हे? तो मला मदत करू शकेल.’ पक्ष्याने विचार केला.
परंतु तो पांढरा पक्षी खूप वेगाने उडत होता. लवकरच तो ढगांत गायब झाला.





आता पक्ष्याला उडणंही अशक्य झालं होतं. तो दमून गेला होता. एकटा होता. ना घर ना कोणाचा आधार. तो गवतात उदास होऊन रडत बसला.

तिथूनच एक मुलगा आपल्या मांजरीसोबत चालला होता. नशीब की मुलगा मांजरीच्या आधी तिथं आला.

त्या मुलाला पक्ष्याच्या कथेत रस होता. त्याला अचानकच आठवलं की त्याने त्या पक्ष्याला आधी कुठंतरी पाहिलंय.

"मला माहितीय तुला कुठं जायचंय?" मुलगा जोरात ओरडला.

"मला माहितीय तुझा चित्रकार मित्र कुठं राहतो ! तू चल माझ्यासोबत !"

त्याचवेळी चित्रकाराच्या स्टुडीओमध्ये तो श्रीमंत माणूस आला. त्याच्या बगलेत ते चित्र होतं.

श्रीमंत माणूस खूप चिडलेला होता. त्याला त्याचे पैसे परत हवे होते.

“तू मला पक्ष्याचं चित्र विकलं होतंस. बघ, त्यात पक्षीच नाही.” श्रीमंत माणूस जोरजोरात ओरडत बोलत होता.

परंतु गरीब चित्रकाराजवळ ना पैसे होते ना पक्षी !





श्रीमंत माणूस किंचाळत समोरच्या दारातून बाहेर पडला, त्याचवेळी तो मुलगा पक्ष्याला घेऊन मागील दारातून आत आला.
चित्रकाराला खूपच आनंद झाला. त्याने मुलाला मिठीच मारली. आनंदाने हसत त्याने पक्ष्याला "तुझ्या घरात तुझं स्वागत मित्रा..!" असं म्हटलं.
चित्रातील पक्ष्याला खूप आनंद झाला.
तो पुन्हा आपल्या चित्रातल्या जागी जाऊन बसला.

चित्रकाराने पक्ष्याचे चित्र कधीच न विकण्याचं वचन दिलं.
आणि पक्ष्याने कधीच उडून न जाण्याचं वचन दिलं.
"मी माझे पंख फडफडवण्यासाठी आणि तुमची चित्रं पाहण्यासाठी थोडंसं उडेन बरं का.. अगदी थोडंसं. जास्त नाही." पक्षी बोलला.
पुढे ते दोघे मित्र अखेरपर्यंत आनंदाने सोबत राहिले.



समाप्त

